


# विकासपर्वाचे दिपस्तंभ

# डॉ.शंकरराव चव्हाण

संपादक - प्रा.डॉ.गजानन पाटील

# जलसंवर्धनाचे दिपस्तंभ डॉ. शंकरराव चव्हाण

प्रा. धनंजय रा. जवळेकर
श्री संत गजानन महाविद्यालय खर्डा
ता. जामखेड जि. अह्मदनगर

पौराणिक कथेनुसार भगीरथाच्या तपश्चर्येतून गंगा पृथ्वीवर अवतरली असा समज आहे. गंगेच्या पृथ्वीवर येण्याने पृथ्वी सुजलाम सुफलाम झाली. याचे श्रेय जुन्या काळात भगीरथ ऋषींना दिल्या जाते. संपूर्ण महाराष्ट्रात तलाव, धरणे, कालवे ,बंधारे, बांधून सिंचनाच्या सोयी महाराष्ट्रात निर्माण करून 'आधुनिक महाराष्ट्राचे भगीरथ' म्हणून मा. शंकरराव चव्हानांचा उल्लेख केल्यास वावगे ठरणार नाही. राज्याचे पाटबंधारेमंत्री म्हणून अनेक वर्ष काम करीत असताना शंकररावजींना महाराष्ट्रातील सर्व नद्या, त्यांचे खोरे, पाण्याचे साठे यांचा पूर्ण तपशील माहीत होता. त्यांच्या सिंचन क्षेत्रातील या योगदानामुळेच त्यांच्या अन्त्यसंस्कारच्या दिवशी तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी विष्णुपुरी प्रकल्पाचे ' शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प" असे नामांतर केले,आणी त्यांचा स्मृतिदिन हा 'सिंचन दिन' म्हणून पाळल्या जाईल, असे जाहीर केले. .

मराठवाड्याचा भाग्यविधाता असणारा जायकवाडी प्रकल्प तर मा.शंकररावांच्या सिंचन कर्तृत्वाचा शिरपेच मानला पाहिजे. या धरणाच जागा निश्चित केली तेंव्हा औरंगाबाद व अह्मदनगर जिल्हातील ४५-४५ गावे पाण्याखाली जाणार होती. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन करावे लागणार होते. त्यावेळी वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते, अर्थात हा प्रकल्प पुरा झाला तेंव्हा राज्याचे नेतृत्व शंकररावाकडे आले होते. प्रकल्पग्रस्त जनतेचे पुनर्वसन करूनच शंकरराव चव्हाण यांनी या नाथसागराची निर्मिती केली. केंद्रीय मंत्रीमंडळात त्यावेळी डॉक्टर व्ही.

के. राव यांनी जायकवाडी संबंधात जे आक्षेप घेतले होते, त्याची अतिशय मुद्देसूद उत्तरे शंकररावजीनी पटवून दिल्यामुळे या धरणाचे सर्व मार्ग मोकळे झाले होते, त्याची अतिशय मुद्देसूद उत्तरे मा. शंकररावजीनी पटवून दिल्यामुळे या धरणाचे सर्व मार्ग मोकळे झाले होते. श्री. व्ही. के. राव यांनी लवादाचा निर्णय देताना असे स्पष्टपणे लिहून ठेवले आहे की, "मी आजपपर्यंत अनेक पाट-बंधारे मन्त्रांशी चर्चा केली आहे, मात्र जायकवाडी संदर्भात असलेल्या आक्षेपांना इतकी मुद्देसूद आणी अभ्यासपूर्ण उत्तर देणारे शंकरराव चव्हाण यांच्यासारखा मंत्री पाहिलेला नाही".याचे कारण असे होते की मा. शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री म्हणून १२ वर्ष काम केले होते. दुसर्यांदा मुख्यंमत्री झाल्यानंतर देखील मा. शंकरराव चव्हाण यांनी पाटबंधारे खाते दोन वर्ष आपल्याकडेच ठेवले होते. त्यामुळे एकंदर १४ वर्ष महाराष्ट्र मंत्रीमंडळात पाटबंधारे खाते त्यांच्याकडेच असल्याने व त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे साहेब या विषयातील तज्ञ बनले. प. जवाहरलाल नेहरूं -नी 'शंकरराव चव्हाणानी महाराष्ट्रास भारताच्या नकाशावर आणले.' अशा शब्दात त्यांचा गौरव केला.

पाटबंधारे खात्याचे मंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रातील अस्तिवात असलेल्या पण जीर्ण झाल्याने सिंचन क्षमता कमी झालेल्या तलावांची दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम मा. शंकररावांनी हाती घेतला स्थानिक लोकांचा यात सहभाग वाढावा यासाठी तलावांच्या दुरुस्तीकरीता ग्रामपंचायात व लोकसहभागातून निधी गोळा करावा व तलाव दुरुस्त करावे असा ठराव विधानसभेत मंजूर करून घेतला, शिवाय २५० एकर जमीन भिजेल अशा सर्व तलावावर महाराष्ट्र सरकार खर्च करे -ल त्यासाठी शेतकऱ्यांकडून एकही पैसा घेतला जाणार नाही असा विधीमंडळ ठराव श्री. शंकरराव चव्हाण यांनी पास करवून घेतल्यामुळे महाराष्ट्रातील शेकडो तलावांची दुरुस्ती करण्यात आली यातून सिंचन सुविधा वाढल्या व वाढत्या उत्पादनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन वाढले. त्याचबरोबर पाण्याची नासाडी होऊ नये म्हणून, त्याचा काळजीपूर्वक वापर व्हावा म्हणून पानिपट्टी आकारल्या गेली. त्यास विरोधी नेत्यांनी आक्षेप घेतला पण केवळ लोकानुरंजनास ते बळी पडले नाहीत माफक का होईना पाणीपट्टी आकारल्या जावी या मतावर मा. चव्हाण

साहेब ठाम राहिले. भंडारा जिल्ह्यात एकून ६८ मालगुजारी तलाव होते. त्या सर्वच तलावांची दुरुस्ती केल्या गेली. चंद्रपुर जिल्ह्यात एकून ६५ मालगुजारी तलाव होते त्यापैकी ५६ तलावांचे काम पहिल्या वर्षी तर उर्वरित तलवांची दुरुस्ती दुसऱ्याच वर्षात पूर्ण केल्या गेली . केवळ भंडारा व चंद्रपूर जिल्यातील जवळपास १००० मालगुजारी तलावांची दुरुस्ती १९७५ पर्यंत शंकरराव चव्हाणांनी केली. आज त्यामुळेच भंडारा जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जातो. विदर्भातील हजारों एकर जमीन यामुळे सिंचनाखाली आली याचे श्रेय पाटबंधारे म्हणून चव्हाण साहेबाना द्यावेच लागेल.

सत्तरच्या दशकात केंद्र सरकारने देश पातळीवर पाटबंधारे प्रकल्पांचा आढावा घेण्याकरीता व सिंचन क्षमतेची वाढ व्हावी यासाठी फायनान्स कमिशनची निर्मिती केली होती हे मंडळ देशातील आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ज्या राज्यांना सिंचानाची फार आवश्यकता आहे त्याठीकानच्या योजनांना प्राधान्य देत त्या योजना कार्यान्वित करणार होते. या कमिशन पुढे गोदावरी प्रकल्प, भीमा प्रकल्प व दूधगंगा प्रकल्पाचे अभ्यासपूर्ण सादरीकरण करून या योजनांना लागणारा निधी त्यानी केंद्राकडून मंजूर करून घेतला. इतकेच नव्हे तर मध्यप्रदेश सरकारसोबत करार घडवून वाघ, पेंच, करबंदा, तापी प्रकल्प मार्गी लावले याचा फायदा दोन्ही राज्यांना झाला. या कार्याची दखल घेऊन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पुढील शब्दात शंकररावांचा गौरव केला" महाराष्ट्राची बाजू व त्यातील तांत्रिक व शासकीय बारकाव्यांसह केंद्र सरकारला पटवून देण्याचे जे काम आमच्या इंजिनियर व खात्याच्या सचिवांना जमले नाही ते शंकरराव चव्हाण यांनी करून दाखवीले आहे''. पश्चिम महाराष्ट्राचा भाग्यविधाता प्रकल्प म्हणून ज्या कोयना प्रकल्पाचा उल्लेख केला जातों तो प्रकल्प देखील मा. शंकररावांच्या अथक प्‌्यत्नाने पुरा झाला आहे हे बऱ्याचजणांना माहीत नाही. त्यावेळेस पाटबंधारे मंत्री म्हणून मा. शंकरराव चव्हाणांनी प्रकल्पाला होणारा विरोध, विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करून संपुष्टात आणला. या प्रकल्पातून होणाऱ्या वीजनिर्मितीमुळे पश्चिम महाराष्ट्रातील वीज तुटवडा संपून औद्योगिकीरणास चालना मिळाली. मा. शंकरराव चव्हानाच्या पुढाकाराने संपूर्ण

महाराष्ट्राचा पाटबंधारे संदर्भात सर्व्हे केला गेला. त्यात सोलापूर जिल्हा परिसरातील पाण्याचे दुर्भिक्ष अधोरेखित झाले. त्यामुळे भीमा प्रकल्प हाती घेतला गेला यावेळी या प्रकल्पामुळे पाणीसाठा जास्त प्रमाणात होऊ शकणार नाही वगैरे अफवा उठवण्यात आल्या परंतु आपल्या सूक्ष्म अभ्यासामुळे चव्हाण साहेबांनी राजकारण बाजूला ठेऊन हा प्रकल्प पूर्ण केला. दांडेकर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अविकसित भागामध्ये सिंचन सुविधा वाढविण्यासाठी नदी खोऱ्याच्या विचार केला आणि तसा विचार करताना जी गोष्ट ज्याठिकाणी करणे आवश्यक असते ती गोष्ट त्याठिकाणी केली. ती योजना कोणत्या तालुक्यात कोणत्या जि-ल्ह्यात येते हा प्रश्न शंकरराव चव्हाणांनी गौण मानला. राज्यातील सर्व नद्यांचे सर्वे करून त्या त्या नदी खोऱ्या संबंधी माष्टर प्लान तयार तयार केले गेले. हे तयार करत असताना संबंधित अधिकार्यांशी विचार विनिमय करून पिण्याकरिता किती पाणी राखून ठेवले पाहिजे, शेती सिंचनासाठी व उद्योगाकरिता किती आणि वीजनिर्मिती करिता किती पाणी राखून ठेवणे आवश्यक आहे याची क्रमवारीही निश्चित केल्याने त्या पाणी वाटपासंदर्भात होणारे संभाव्य वाद देखील टाळल्या गेले. अहमदनगर जिल्ह्यात जी आज समृद्ध साखर कारखानदारी दिसते त्यामागे मा. चव्हाण साहेबांनी कुकडी प्रकल्पाच्या रूपाने केलेले कार्य कारणीभूत आहे. श्रीगोंदा, जुन्नर, आंबेगाव व शिरूर तालुक्याचा भाग हा अवर्षण ग्रस्त होता तेथील पाणीटंचाई लक्षात घेता पुण्यापासून ५० मैलावर पडेगाव येथे हा प्रकल्प उभारल्या गेला कुकडी प्रकल्प हा पाच जलाशयांचा आहे. यातील तीन अहमदनगर जिल्ह्यात येतात. या योजनेच्या मंजुरीसाठी त्यांनी देशाचे तत्कालीन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे पाठपुरवठा करून त्यासाठी निधी मंजूर केला.ही योजना लागू करताना प्रकल्पग्रस्ताना हाताशी धरून चव्हाण साहेबांच्या या प्रकल्पांनाच काही राजकीय नेते विरोध करू लागले तेंव्हा प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमीन देण्यसाठी शाषनाने प्रयत्न केल्याने हा विरोध संपुष्टात आला. या प्रकल्पामुळे आज अहमदनगर जिल्हा सुजलाम सुफलाम झाला आहे. भंडारदरा धरणाच्या भिंतीला १९७१ साली तडे गेल्यानंतर त्याची युद्धपातळीवर दाखल घेऊन ते दुरुस्त करण्याचे कार्यही चव्हाण साहेबांनी केले. विदर्भातील पूस नदीवरील

पुसद पासून जवळ असणाऱ्या मरसूल या गावाजवळ मातीचे धरण व्हावे यासाठी योजना, प्रकल्प अहवाल संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यापूर्वी तयार केल्या गेली, पण काही कारणाने हा प्रकल्प १९६६ पर्यंत रेंगाळला, हा प्रकल्प हाती घेऊन पूर्ण केला गेला .या प्रकल्पामुळे याभागात मासेमारीला प्रोत्साहन मिळाले.अप्पर वर्धा धरण बांधत असताना जोपर्यंत धरणाचे काम पूर्ण होणार नाही तो पर्यंत प्रकल्प बाधित शेतकर्यांना शासनाकडून मिळालेली पर्यायी जमीन व स्व:ताची जमीन कस –ण्यासाठी परवानगी देण्यात आली.

मा.चव्हाण साहेबांनी मराठवाडा भागातील मनार, सिद्धेश्वर, निम्न तेरणा, येलदरी, दुधना या प्रकल्पांचे सर्वेक्षणकरून या प्रकल्पांना मजुरी मिळावी यासाठी केंद्र शासनाकडे हे प्रस्ताव पाठविले. लघु व मध्यम प्रकल्प कोल्हापूर बंधारे, पाझर तलाव नालाबंडिंग याचे जाळे मराठवाडा विभागात विणले. मराठवाड्यातील सर्वात मोठ्या जायकवाडी प्रकल्पासाठी सहव्या पंचवार्षिक योजनेत भरीव तरतूद केल्याने मार्गी लागला.या प्रकल्पासाठी विस्थापित गावांच्या प्रश्नामुळे खूप विरोध झाला. यासाठी निदर्शने झाली. या प्रकल्पास होणारा राजकीय विरोध पाहता मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी हा प्रकल्प रेंगाळत ठेवण्याचा निर्णय घेतला पण मा. शंकरराव चव्हाण साहेबांनी या प्रकल्पामुळे होणारा फायदा मुख्यमंत्र्यासहित विरोध करणाऱ्या राजकीय नेत्यांना पटवून दिल्याने यावर सकारात्मक विचार झाला. विस्थापित शेतकर्यांना पर्यायी जमीन देण्याचा शासन प्रयत्न करेल असा विश्वास दिल्यानंतर काही स्थानिकांनी विरोध चालूच ठेवला. इतकेच नव्हे तर शेगाव येथे उपहासात्मक सत्कार समारंभ आयोजित करून चव्हाण साहेबांना शिव्यांची लाखोली वहिल्या गेली. हे सर्व हालाहल या आधुनिक शंकररावांनी पचविले व गोदावरीचे निर्मल पाणी शिवशंभोसारखे जनतेला मिळवून दिले. या प्रकल्पामुळे आज मराठवाड्यातील २७८०० हेक्टर जमीन ओलिताखाली आली व शेतकर्यांचे दारिद्र्य फिटले. याच प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात सिंदफणा नदीवर ४४० द.ल.घ.मी. क्षमता असलेले धरण बांधले व पैठण उजवा कालवा व माजलगाव डावा कालवा ही कामे पूर्ण करण्यात आली. १६५ व १३२ किलोमीटरचे हे जायकवाडी प्रकल्पाचे कालवे आज मराठवाड्याची

तहान भागवत आहेत.औद्योगिक कारखान्यात लागणारी वीजही हा प्रकल्प पुरवत आहे. या प्रकल्पातून १२ मेगावॅट वीजनिर्माण होते या प्रकल्पासाठी ३५००० हेक्टर जमीन अधिग्रहित केली गेली तर ११५ गावांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला. पैठण उजवा कालवा पासून एक लाख ४२ हजार हेक्टर व माजलगाव उजव्या कालापासून ९४ हजार हेक्टर क्षेत्रातील जमिनीस पाणी उपलब्ध झाल्याने मराठवाड्याचा मागासलेपणा दूर झाला.परभणी जिल्ह्यातील जिंतूर जवळ येलदरी गावाजवळ धरण बांधण्यात आले. धरणाच्या पायथ्याशी विद्युतगृह बांधण्यात आले, त्याद्वारे सात हजार पाचशे किलो वॅट वीजनिर्मिती देखील करण्यात येते.जवळपास चौदा हजार पाचशे फूट धरणाची लांबी असून उंची १६५ फूट आहे. १९६२ साली जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने ७१९ लाख रुपये मदत कर्जाच्या रुपाने मिळाल्याने हा प्रकल्प १२२००२ जमिनीला पाणी पुरवठा येलदरी व सिद्धेश्वर हे पूर्णा प्रकल्पाच्या अंतर्गत पूर्ण झाले आहे त्याची मुहूर् तमेढ शंकरराव चव्हाण यांनीच रोवली होती .आज आशिया खंडातील सर्वात मोठी व पहिली उपसासिंचन योजना नांदेड शहराच्यालगत विष्णुपुरी प्रकल्पाच्या रुपाने माननीय शंकररावांचे त्यांच्या कर्म भूमीत स्मारक चठरले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कोयना, उजनी, कुकडी, जायकवाडी, विष्णुपुरी, यासारखे महाराष्ट्रातील महत्वाची धरणे माननीय शंकराव चव्हाण आणि धडाडीने उभी केली व यामुळे आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून दारिद्र्य दूर झाले आहे. प्रांतवादी विचार न करता समग्रपणे महाराष्ट्राचा विचार करणारे हे नेतृत्व होते त्यामुळेच माननीय शरद पवार यांनी मा . शंकरराव चव्हाण यांच्या संदर्भात पुढील उद्गार काढले आहेत,“राज्यातील पाटबंधार्याच्या मोठ्या प्रकल्पात शंकरराव चव्हाण यांचे योगदान महत्वाचे आहे, शेतकरी हे कधीच विसरणार नाहीत.” त्यामुळे महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक म्हणून त्यांचा गौरव केल्यास तो वावगा ठरणार नाही.महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून जो ठसा महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रावर उमटावला तो काळालाहीविसरता येण्यासारखा नाही. कनेर, दूधगंगा, मनार ,पेंच, मांजरा, नांदूर मध्यमेश्वर, लेंडी, खडकवासला, इटियाडोह, पूर्णा, मुळा, गिरणा, घोड, सुखी इत्यादी पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यातून

वाहणारे पाणी शंकररावांच्या कर्तुत्वाची गाणी गात आहेत.

**संदर्भग्रंथ :**

१. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, अनंत भालेराव, प्रकाशक गोविंदभाई श्रॉफ,औरंगाबाद (१९८७).

२. हैद्राबाद : विमोचन आणि विसर्जन, कुरुंदकर नरहर मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश(१९८५).

३. गोदाकाठचा राजयोगी, प्रा.उत्तम सूर्यवंशी (संपादन) लेखक कुसुम-ताई शं.चव्हाण,धर्माबाद शिक्षण संस्था, (१९९४).

४. मराठवाड्याचा विकास दिशा आणि गती (शंकरराव चव्हाण गौरव ग्रंथ), डॉ.जे.जी.वाडेकर (संपादन), नांदेड (१९७५).

५. यशवंतराव ते विलासराव, मधुकर भावे, मनोविकास प्रकाशन, पुणे.

६. मराठवाड्याचे शिल्पकार, अनंत भालेराव, नरेंद्र चपळगावकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (२०१२).

७. महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (२०१०).

८. शंकरराव चव्हाण जीवन व कार्य, डॉ.उत्तम सावंत, निर्मल प्रकाशन, नांदेड (२०००).

९. भारतीय राजकारणातील दीपस्तंभ डॉ.शंकरराव चव्हाण, प्राचार्य डॉ.शोभा कदम (संपादक), शिवाजी प्रकाशन, पुणे (१४ जुलै २०२०).

१०. दैनिक लोकसत्ता, दि. २४ डिसेंबर, २०१३.

११. दैनिक सत्यप्रभा, दि. २६ फेब्रुवारी, २०२१.